भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १ ७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०४/२०१८

**१) मेटयाडोर व ट्रॅव्हल्सच्या धडकेत दोघाचा मृत्यु व इतर प्रवासी यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोद:–**

दिंनाक ०१/०४/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी मृतक दिनेश रावजी चौधरी वय ४० वर्ष रा. डोंगरी बु. याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोर चालणा–या मेटयाडोरला ओव्हरटेक करीत असता समोरून येणा–या सितल ट्रॅव्हल्स क्र. एमएच ५० टी ०२१८ ला आमोरा–समोर धडक दिली व अपघता मध्ये स्वत:चे मरणास तसेच कुसुम पृथ्वीराज सरोदे वय ४५ वर्ष रा. कुरमुडा हीचे मरणास तसेच महेन्द्रा मॅक्स गाडी मधील प्रवासी व ट्रॅव्हल्स मधील प्रवाशी यांना अपघातात जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने, जखमी रूग्न फिर्यादी भोजराम सिताराम मुर्खे वय ४८ वर्ष रा. बडपाणी जि. बालाघाट यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०४(अ),३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खैरकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) टवेरा गाडीने स्विप्ट गाडीला मागेहुन धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोद:–**

दिंनाक ०१/०४/२०१८ चे ०९.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे स्विप्ट डीझायर गाडी क्र. एमएच ३१ डीसी ६६६९ ने कुटुंबासह लोहारा येथुन साकोली भंडारा मार्गे नागपुर येथे जात असता पथकर नाका कारधा येथे टोल भरण्यास त्याची स्विप्ट गाडी थांबविली असता यातील आरोपी चालकाने त्याची टवेरा गाडी भरधाव वेगाने निष्काळजीपणे मागेहुन चालवीत आणुन उभ्या असलेल्या फिर्यादीचे स्विप्ट गाडीला मागेहुन धडक देवुन नुकसान करून पडुन गेल्याने, फिर्यादी प्रमोद शंकर डोंगरे वय ४८ वर्ष रा. दादाजी नगर जयताळा नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भादवी. सहकलम १८४,१३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) सोन्या–चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी:–**

दिंनाक २६/०३/२०१८ चे ०९.०० वाजता ते दि. ३१/०३/२०१८ चे चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी च्या पत्नीने बेडरूम मधील संज्याचे वर गंजाखाली प्लास्टीकचे डब्यांत ठेवलेल्या पर्स मधील सोन्या–चांदीचे दागीने १) एक सोन्याची नथ ३.५ ग्रॅम कि. १०,०००/रु. २) मंगळसुत्र लॉकेट ,गहुमनी व बारीक मनी वजन ११ ग्रॅम कि. २५,०००/रु ३) १० मनी वजन १ ग्रॅम कि. २०००/रु. ४) चांदीच्या तोरडया वजन ५० ग्रॅम कि. २०००/रु. व २००/रु. गदी असा एकुन ३९,२००/रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी अखाडु रामाजी हरखडे वय ४८ वर्ष रा. इंदुरखा यांचे तोंडी रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून लाकडी दांडयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक ०१/०४/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीची भाऊ जखमी योगेद्र श्रीराम बागडे यास 'तु माझे दुकाना समोर गाडी कशाला ऊभी करतोस' असे म्हणुन त्याचे दुकानातील लाकडी दांडयाने डोक्यावर मारून जखमी केले व फिर्यादी बरोबर लांबाझोबी केल्याने फिर्यादी संतोष श्रीराम बागडे वय ३४ वर्ष रा. नेहरूवार्ड सिहोरा यांचे तोंडी रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४,३२३,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

५) दोन इसमाचा गुदमरल्याने मृत्यु –

दिंनाक ०१/०४/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी इसम माधो ब्राम्हणकर वय ६० वर्ष रा. चिखली हा त्याचा पुतण्या नामे १) मृतक विलास दामाजी ब्राम्हणकर वय ३३ वर्ष रा. चिखली जि. गोंदीया २) विलास दामाजी ब्राम्हणकर वय २२ वर्ष रा. चिखली जि. गोंदीया याचे सह एस.के मेहता अॅन्ड कंपनी येथे डांबरी बदरीचा हॅाट मिक्स प्लॅन्ट मधील टॅन्क मधुन ऑइर्लचे गाळ बाहेर काढुन टॅन्क साफ करीत असतांनी दोन्ही मृतक हे टॅन्क मध्ये गुदमरून मरण पावल्याने फिर्यादी ईसन माधो ब्राम्हणकर वय ६० वर्ष रा. चिखली ता. मोरगाव जि. गोंदिया यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

६) मोटार सायकल वरून खाली पडुन डोक्याला मार लागुन महिलेचा मृत्यु –

दिंनाक ०१/०४/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. प्रिती अनुरूध्द वहीले वय ३२ वर्ष रा. नागपुर ही तिचे पती सोबत मोटार सायकलने लाखनी वरून भंडारा मार्गे जात असता, मोटार साकल वरून खाली पडुन डोक्याला मार लागल्याने तीला औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे नेले असता, तेथील डॉक्टरनी तपासुन मृत घोषीत केल्याने, डॉ. लेखी मेमो वरून व सरतर्फे फिर्यादी पोहवा. फुंडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी आतराम पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

७) अवैध दारु अडड्यांवर धाडी . :–

दिनांक ०१/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन पालांदुर येथे अवैध देशी दारु अडड्यावर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०२ लिटर ७०० मिलीलीटर देशी दारू किमती ७५०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०१/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०२ तीन सिटर वाहनाकरीता ०१ ईतर वाहनांवरती – ८४ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.